SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २०.०१.२०२५ | अंक नं. २७० | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



सहल थंड प्रदेशाची
• थर्मल • स्वेटर्स • जर्किन
• ग्लोज • सॉक्स • कॅप्स्
बरंच काही एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला • कापड बाजार, नं. 9422226599
• यशोदानगर, पाईपलाईन रोड,
• सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# कापड बाजार परिसरातील अतिक्रमणे ८ दिवसात काढा अन्यथा तीव्र आंदोलन

## अहिल्यानगर हिंदू समाजाचा महानगरपालिका आयुक्तांना इशारा



कापड बाजार परिसरातील अतिक्रमणे ८ दिवसात काढा अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशाऱ्याचे निवेदन मनपा आयुक्त डांगे यांना देताना अहिल्यानगर हिंदू समाजाचे कार्यकर्ते.

नगर - ८ वर्षांपासून सतत पाठपुरावा करुनही अतिक्रमणांवर कारवाई होत नाही. कापड बाजार, गंज बाजार, घास गल्ली, मोची गल्ली येथे अनधिकृत फेरीवाले रस्त्यावरच दुकाने मांडून त्यांनी अतिक्रमण केले आहे. त्यामुळे रहदारीस प्रचंड अडथळा निर्माण होत आहे. शिवाय या अतिक्रमणामुळे अनेक वेळा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो तसेच महिलांची छेडछाड मोठ्या प्रमाणात होत आहे.

तसेच आगामी कालावधीत मोठ्या प्रमाणावर सण उत्सव साजरे होणार आहेत. तरी त्यांचा कायमचा बंदोबस्त करण्यात यावा, परंतु महानगरपालिकेचे कर्मचारी याकडे सातत्याने दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे मनपा कर्मचाऱ्यांचे अतिक्रमणधारकांसोबत अर्थपूर्ण संबंध असल्याचे समजते. तरी आठ दिवसात अतिक्रमणे तात्काळ काढण्याचे आदेश द्यावेत अन्यथा आम्ही तीव्र स्वरुपाचे आंदोलन करुन प्रसंगी स्वतः जेसीबी घेऊन अतिक्रमणे काढून टाकू. त्यानंतर निर्माण होणाऱ्या कायदा सुव्यवस्थेस सर्वस्वी आपणच जबाबदार असाल, असा इशारा शहरातील हिंदू समाजाने महापालिका आयुक्तांना निवेदनाद्वारे दिला आहे.


VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
VARMORA KERAKOLL CARYSIL colortile RAK NIRALI TIMEX ICON



कुष्ठधामरोड, प्राईम लोकेशन (सावेडी)
येथे १८ मी.आणि १२ मीटर रोडलगतचे
कॉर्नर शॉप ग्राऊंड फ्लोअर : १२०० स्क्वे.फूट
फर्स्ट फ्लोअर : १३०० स्क्वे.फूट



विकणे अथवा लिजवर देणे आहे.
असे ॲटच शॉप्स :
बँक, ज्वेलरी शोरुम, रेडीमेड शोरुम, साडी स्टोअर, सायकल शोरुमसाठी उपयुक्त
संपर्क : 9225325716, 9225323574





मायेचं आभाळ हरपलं !

भावपूर्ण श्रद्धांजली

कै. रामकृष्ण गणपत पडोळे

स्व. दि. १२/१/२०२५

सहवास जरी सुटला तरी स्मृति सुगंध देत राहिल.
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहिल.

।। दशक्रिया विधी ।।

मंगळवार दि. २१/१/२०२५ रोजी सकाळी ८.०० वा.
अमरधाम, नालेगांव, अहिल्यानगर येथे होईल.

ह.भ.प. रामायणाचार्य मनोहर महाराज सिनारे
निंभेरे, राहुरी यांचे प्रवचन होईल

* दुःखाकित *
समस्त पडोळे परिवार
टिळक रोड, अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## कडेलोटाकडे जाणारे हवामान बदल

आपण सध्या खूप उलथापालथ असलेल्या काळात राहात आहोत. सध्याचे जग हे भूराजकीय हालचाली व संघर्षाने वेढलेले आहे. त्यातच युद्धजन्य व आर्थिक मंदी वाढतेय. नैसर्गिक स्त्रोत वेगाने कमी होत असून बदलत्या हवामान, पर्यावरणाने प्रचंड नुकसान होत आहे.

आपण एका नव्या युगात प्रवेश करत आहोत. शास्त्रज्ञ त्याला 'ॲंथ्रोपसीन एज' म्हणत आहेत. ते मानवी घडामोडींचा पृथ्वीच्या हवामान बदल आणि पर्यावरणावर मोठा परिणाम होत असल्याचे द्योतक आहे. हा व्यापक बदलाचा काळ आहे. ट्रम्प यांनी व्यापारयुद्ध सुरू करत उद्योग मायदेशी आणण्याची हमी दिली आहे मात्र त्यामुळे पर्यावरण व आर्थिक दृष्टिकोनातून खर्च वाढणार आहे.

मोठमोठ्या टेक कंपन्या केवळ तंत्रज्ञान व माध्यमच नाही तर राजकारणातही बदल घडवताहेत. खासगीकरणाचा बोलबाला वाढलाय. जग अधिकच असुरक्षित, असमान झाले आहे. कोरोनाने विषमता अधिकच वाढवली. (त्यात आणखी एका नव्या आरोग्य समस्येचा राक्षस आला आहे)

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१




हवामान व पर्यावरण रक्षण व संवर्धनास श्रीमंत देश सहकार्य करीत नाहीत. ग्लोबलायजेशनात सर्वच देश स्वहित पाहात असल्याने गरीब व छोटे देश असहाय्य झालेत. ओझोनचा थर, बर्फ वितळणे, समुद्र पातळी वाढणे, ग्रीन एनर्जी, भूकंप, अवेळी प्रचंड पाऊस या घटना म्हणजे पर्यावरणाचा कडेलट होत आहे.

(संदर्भ– सुनीता नारायण, ज्येष्ठ पर्यावरणतज्ञ)

# निवृत्त अभियंता आर. जी. सातपुते यांना पुन्हा मनपा सेवेत घेतल्यास जनआंदोलन उभारणार

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेचे निवृत्त अभियंता आर. जी. सातपुते यांना परत मानधनावर अथवा कोणत्याही मार्गाने महानगरपालिका सेवेत घेऊ नये अन्यथा तीव्र जनआंदोलन उभे करण्याचा इशारा भ्रष्टाचार विरोधी दक्षता अभियान संघटनेने दिला आहे. आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर महानगरपालिकेतील अभियंता आर. जी. सातपुते ३१ मे २०२३ अखेर सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचे सेवानिवृत्तीनंतर त्यांना परत महानगरपालिका सेवेत घेण्याचा घाट सध्या घातला जात आहे. महानगरपालिका सेवेत अधिकारी/अभियंता यांची कमतरता असल्याचे कारण देवून श्री. सातपुते यांना मानधन तत्वावर, कंत्राटी पध्दतीने परत सेवेत घेण्याबाबतचा अर्ज श्री. सातपुते यांनी केल्याचे समजते आहे.

मात्र सातपुते यांची संपूर्ण सेवा ही भ्रष्ट्राचारी पध्दतीने झालेली आहे. त्यांचे संपूर्ण सेवेत त्यांच्यावर २ ते ३ वेळेस निलंबनासारखी कारवाई झालेली आहे. त्यांच्यावर वेगवेगळ्या ७ ते ८ विषयांबाबतची विभागीय चौकशी चालू आहे. एका विद्युत विभागाच्या प्रकरणात तर तत्कालीन आयुक्त यांनी स्वतः त्यांच्यावर फौजदारी कारवाई केलेली आहे. या प्रकरणात श्री. सातपुते यांना अटकही झालेली आहे. त्यांच्याविरूध्द न्यायालयीन प्रक्रियाही चालू आहे. त्यामुळे अशा भ्रष्ट इसमांस परत सेवेत घेण्यास संघटनेचा पूर्ण विरोध आहे.

श्री. सातपुते हे नियमित गैरमार्गांचा अवलंब करीत असून, आताही ते परत सेवेत येण्यासाठी गैरमार्गाचा अवलंब करित आहेत.

विजय कुलकर्णी हे 'आयुक्त' असताना श्री. सातपुते हे भ्रष्ट आहेत व त्यांना सेवेतून बडतर्फ करून कार्यमुक्त करण्याबाबतचा स्पष्ट असा अहवाल दिलेला आहे. मात्र नंतर तो अहवाल श्री. सातपुते यांनी भ्रष्ट मार्गाने दाबून टाकलेला आहे.

अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना परत सेवेत घेतल्यास प्रशासनास गालबोट लागणार आहे. त्याचे श्री. सातपुते यांना कोणत्याही परिस्थितीत सेवेत घेवू नये अन्यथा महानगरपालिकेविरूध्द तीव्र स्वरूपाचे जन आंदोलन उभारावे लागेल तसेच वेळप्रसंगी न्यायालयातही जावे लागेल.

श्री. सातपुते यांनी वेळोवेळी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होईल, असे कामकाज केलेले आहे, असे त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मत आहे. त्यांच्याकडे तांत्रिक ज्ञानाची कमतरता आहे, असे ऐकिवात आहे. त्यामुळे त्यांना कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही मार्गाने सेवेत घेण्यात येवू नये, अशी मागणी भ्रष्टाचार विरोधी दक्षता अभियान संघटनेने केली आहे.

## रिक्षाचालक व त्याच्या साथीदारांकडून वकिलाला बेदम मारहाण

नगर – चारचाकी व रिक्षाच्या अपघातानंतर रिक्षा चालक आणि त्याच्या परिचयातील सात–आठ इसमांनी चारचाकीतील वकीलावर हल्ला केल्याची घटना १७ जानेवारीला रात्री १०.३५ वाजेच्या सुमारास नागापूर एमआयडीसीतील सह्याद्री चौकात घडली. संदीप रामदास वांडेकर (रा. पाइपलाईन रस्ता, सावेडी) असे मारहाण झालेल्या वकीलाचे नाव आहे.

दरम्यान, त्यांनी या प्रकरणी १८ जानेवारीला एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून रिक्षा (एमएच १६ एबी ५०१५) वरील चालक व त्याच्या सोबतच्या अनोळखी इसमांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी आपल्या वाहनाने राहुरी येथून घरी जात असताना विरूध्द बाजूने आलेल्या रिक्षाने त्यांच्या वाहनास उजव्या बाजूने धडक दिली. वाद झाल्यावर फिर्यादीने रिक्षा चालकाला जाब विचारला. यावेळी रिक्षा चालकाच्या सांगण्यावरून सात ते आठ अनोळखी इसमांनी विनाकारण फिर्यादीला मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादीच्या डोळ्याला, तोंडाला, पाठीवर, नाकाला आणि पोटावर मुक्का मार लागल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

दरम्यान, घटनेनंतर ॲड. वांडेकर यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे गाठून घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला व फिर्याद दिली. पोलीस अंमलदार चौधरी अधिक तपास करत आहेत.

## अपघातातील जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर – अपघातामध्ये गंभीर जखमी झालेल्या ६४ वर्षीय वृध्द इसमास औषध उपचाराकरिता खाजगी रुग्णालयात दाखल केले असता, उपचारादरम्यान १९ जानेवारी रोजी सायंकाळी त्यांचा मृत्यू झाला. गोपाल काळू सारवान (रा.माळीवाडा, अ.नगर) असे मयताचे नाव आहे.

याबाबतची माहिती अशी की १३ जानेवारी रोजी मार्केट यार्ड ते माळीवाडा वेस कडे जाणाऱ्या रोडने पायी जाणाऱ्या गोपाल सारवान यांना भरधाव वेगातील मोटारसायकलने धडक दिली. या धडकेत बरगडीला मार लागल्याने सारवान हे गंभीर जखमी झाले. त्यांना घटनास्थळावरील नागरिकांनी औषधोपचाराकरिता खासगी रुग्णालयात दाखल केले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू असताना १९ जानेवारीला सायंकाळी त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी पॅसीफीक हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत गायकवाड यांनी दिलेल्या अहवालावरून कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली अधिक तपास पोलीस हवालदार आनंद दाणी हे करीत आहे.

## कंपनी समोरून दुचाकीची चोरी

नगर – नगर तालुक्यातील टाकळी काझी शिवारातील सुपर सिमेंट कंपनी समोर रस्त्याच्या कडेला हँडेल लॉक करून लावलेली रायडर कंपनीची मोटारसायकल (क्र. एम एच १७ डी बी ६८१४) व ओप्पो कंपनीचा मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे.

याप्रकरणी सतीश दुर्योधन टकले (वय १९, रा. देडगाव, ता.नेवासा) यांनी दिलेले फिर्यादीवरून नगर तालुका पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# पिडित नागरिकांची 'फिर्याद' घेण्यास पोलिस ठाणे अंमलदाराकडून टाळाटाळ

### कोतवाली पोलिस ठाण्यातील प्रकार, नागरिकाला मारायला लावल्या चकरा

नगर – मालवाहू टेम्पो चालकाच्या टेम्पोची काच अज्ञात व्यक्तीने फोडून नुकसान केल्याने याबाबत फिर्याद देण्यासाठी कोतवाली पोलिस ठाण्यात गेलेल्या टेम्पो चालकाला अगोदर थेट तोफखाना पोलिस ठाण्यात पाठविले. त्यानंतर घटना कोतवाली हद्दीतच झाली असल्याचे सांगितल्यावर गाडीची कागदपत्रे आणा, सध्या वेळ नाही, थोड्या वेळाने या सांगत पोलिस ठाणे अंमलदाराने त्या टेम्पो चालकाची फिर्याद घेण्यास टाळाटाळ केल्याचा प्रकार १९ जानेवारीला घडला.

शहरातील एक मालवाहू टेम्पो चालकाला जुन्या वसंत टॉकीज जवळ एक भाडे असल्याने तो दुपारी तेथे गेला होता. रस्त्याच्या कडेला टेम्पो उभा करून तो भाडे ठरविण्यासाठी त्या परिसरातील एका दुकानात गेला. तेथून पुन्हा टेम्पोकडे आल्यावर त्याला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने त्याच्या टेम्पोची काच फोडून नुकसान केल्याचे दिसून आले. याबाबत तक्रार देण्यासाठी तो कोतवाली पोलिस ठाण्यात गेला. तेथील ठाणे अंमलदाराने त्याला ही घटना आमच्या हद्दीत नाही तर तोफखाना पोलिस ठाण्याच्या हद्दीत झाल्याचे सांगत तिकडे फिर्याद द्यायला जा, असे सांगितले.

तो टेम्पो चालक तोफखाना पोलिस ठाण्यात गेला असता त्याला जुनी वसंत टॉकीज परिसर हा कोतवाली पोलिस ठाण्याच्याच हद्दीत येतो, तुम्ही तिकडे जा असे सांगण्यात आले. तो टेम्पो चालक पुन्हा कोतवाली पोलिस ठाण्यात आला असता, त्याच ठाणे अंमलदाराने त्याच्यावर अनावश्यक प्रश्नांची सरबत्ती करत, तुला गाडीवर लक्ष ठेवता येत नाही का? जा गाडीची सर्व कागदपत्रे घेवून ये असे म्हणत पुन्हा त्याला बाहेर पाठविले. ३ – ४ तास ताटकळत ठेवून आणि चकरा मारायला लावूनही आपली फिर्याद नोंदवून घेतली नसल्याची माहिती त्या टेम्पो चालकाने दैनिक नवामराठा प्रतिनिधीशी संपर्क साधून दिली.

### एकीकडे तक्रार निवारण दिनाचे आयोजन तर दुसरीकडे...

राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रम अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा पोलिस दलाने प्रत्येक पोलिस ठाण्यात आठवड्याचे प्रत्येक शनिवारी तक्रार निवारण दिनाचे आयोजन सुरु केले आहे. यामध्ये नागरिकांच्या तक्रारी सोडविल्या जात असल्याचे सांगितले जात आहे. तर दुसरीकडे पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आलेल्या नागरिकांना अशा प्रकारे वागणूक दिली जात आहे. त्यामुळे हाच का तुमचा १०० दिवसांचा कार्यक्रम असा सवाल उपस्थित होत आहे.

## केडगाव परिसरात तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

नगर – राहत्या घरात छताच्या अँगलला गळफास घेऊन २३ वर्षीय तरुणीने आत्महत्या केल्याची घटना १९ जानेवारीला सकाळी १०.३० च्या सुमारास केडगाव परिसरातील दूधसागर सोसायटी येथे घडली. सायली अजय गवांदे असे मयत तरुणीचे नाव आहे.

सायली हिने राहत्या घराच्या छताला गळफास घेतल्याची बाब लक्षात येताच तिच्या घरच्यांनी तिला तातडीने रुग्णालयात उपचार करीता नेले. परंतु उपचारापूर्वीच तिचा मृत्यु झाला झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याप्रकरणी आनंदऋषीजी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ढगे यांनी दिलेल्या अहवालावरून कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. अधिक तपास पोलीस हवालदार आनंद दाणी करीत आहे.



मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत काम करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना कायमस्वरूपी रोजगार, स्वयंरोजगार उपलब्ध करून द्यावा या व अन्य मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना या प्रशिक्षणार्थींनी निवेदन पाठविले आहे. यावेळी महापालिकेतील सर्व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. (छाया – लहू दळवी)



पंजाबमधील शेतकरी आंदोलनाकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा निषेध करण्यासाठी स्वतंत्र भारत पक्षातर्फे २० जानेवारी रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राज्यव्यापी लाक्षणिक उपोषण करण्यात आले. यावेळी पक्षाचे अध्यक्ष अनिल घनवट, विक्रम शेळके, नीलेश शेडगे, वामनराव भदे, ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बान, सुनीता वानखेडे, नवनाथ दिघे, शीतल पोकळे, बाळासाहेब सातव, अंबादास चव्हाण, पांडुरंग पडवळ, महादेव खामकर, बाबासाहेब रिकामे, कारभारी कणसे, डॉ. संजय कुलकर्णी आदी.

## राधा कृष्णन (राधाशेठ) यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील राधाकृष्णन (राधाशेठ) (वय ५५, रा. गुलमोहोर रोड) यांचे १८ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. ते तोफखाना येथील राधा इलेक्ट्रील्स्चे संचालक होत.

## सागर सावेकर यांचे आकस्मिक निधन



नगर – येथील सागर अरुण सावेकर (वय ४२, रा.रेणुकानगर, बोल्हेगाव फाटा) यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, बहिण असा परिवार आहे. ते किरण पंडीत यांचे जावई होत.

## सय्यद गफ्फार मलंग अत्तार यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – येथील सय्यद गफ्फार मलंग अत्तार (वय ९१, रा.मोमीनगल्ली, भिंगार) यांचे १८ जानेवारी रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नागरदेवळे येथील तोली मस्जिद कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, ५ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## चंद्रभागा भिवसने यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – पिंपळगाव पिसा (ता. श्रीगोंदा) येथील चंद्रभागा सुदाम भिवसने (वय ८२) यांचे १५ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. पाटबंधारे विभागातील सेवानिवृत्त मजदूर होत्या.

त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सुना, नातू, नातसुना, पतवंडे असा मोठा परिवार आहे. येळपणे येथील माध्यमिक शिक्षक भिवसने यांच्या त्या आई, तर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने यांच्या आजी होत्या. त्यांच्यावर पिंपळगाव पिसा हंगा नदी तिरी अंत्यसंस्कार करण्यात आले.

# बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा एन्काउंटर फेक

### हायकोर्टाने ५ पोलिसांना ठरवले दोषी, गुन्हा दाखल करून कारवाईचे दिले आदेश

मुंबई – बदलापूरच्या शाळेत चिमुकलींवर अत्याचार करणारा आरोपी अक्षय शिंदे याचा पोलिसांनी एन्काउंटर केला होता. या एन्काउंटर प्रकरणात ५ पोलिस जबाबदार असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे. अक्षय शिंदेंच्या एन्काऊंटर प्रकरणात ५ पोलिस जबाबदार असून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून कारवाई करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि नीला गोखले यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले आहेत. आरोपी अक्षय शिंदेच्या आई–वडिलांनी एन्काऊंटर विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर आता न्यायालायाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे.

बदलापुरात एका शाळेत शिकणाऱ्या चिमुकल्या मुलींवरील लैंगिक शोषण प्रकरणात अक्षय शिंदे आरोपी होता. एका दुसऱ्या प्रकरणात त्याला तळोजा कारागृहातून ताब्यात घेतल्यानंतर दुसऱ्या तुरुंगात नेत असताना वाटेत त्याचा पोलिसांनी एन्काउंटर केला. आरोपी अक्षय शिंदे याने पोलिसांच्या गाडीतून रिव्हॉल्व्हर हिसकावून पोलिस पथकावर गोळीबार केला होता. त्यानंतर पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी केलेल्या गोळीबारात अक्षय शिंदे ठार झाला असा दावा पोलिसांनी केला होता. मात्र आता न्यायालयीन चौकशी समितीच्या अहवालातून धक्कादायक माहिती समोर आली आहे.

### आई–वडिलांनी घेतली होती न्यायालयात धाव

अक्षय शिंदे याला ऑगस्ट २०२४ मध्ये बदलापूर येथील शाळेच्या शौचालयात दोन चिमुकलींवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी अटक केली होती. तो शाळेत परिचर होता. सप्टेंबरमध्ये तळोजा कारागृहातून चौकशीसाठी नेत असताना वाटेतच पोलिसांनी केलेल्या एन्काउंटरमध्ये चकमकीत शिंदेचा मृत्यू झाला. पोलिसांनी केलेला अक्षय शिंदेचा एन्काउंटर फेक असल्याचा आरोप त्याच्या आई–वडिलांनी केला होता. त्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेत या एन्काउंटरची चौकशी करण्याची मागणी केली. त्यानुसार चौकशीसाठी एका न्यायालयीन चौकशी समितीची स्थापना केली. या समितीने आज आपला अहवाल सादर केला असून एन्काउंटर प्रकरणी ५ पोलिसांना जबाबदार ठरवले आहे.

### चौकशी समितीच्या अहवालात काय म्हटले?

अक्षय शिंदेसोबत झालेल्या झटापटीत पाच पोलिसांनी वापरलेला बळाचा वापर अनावश्यक होता आणि त्याच्या मृत्यूसाठी हे पाचही पोलीस जबाबदार आहेत. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, अक्षय शिंदेंने त्यांच्यावर गोळीबार केला होता. मात्र बंदुकीवर अक्षय शिंदेच्या बोटांचे ठसे नाहीत, असे फॉरेन्सिकच्या अहवालात म्हटले आहे. त्यामुळे स्वसंरक्षणार्थ गोळीबार करणाऱ्या पोलिसांचा वैयक्तिक बचाव अवास्तव आणि संशयास्पद आहे, असे अहवालात म्हटले आहे. अहवालानुसार पोलिस कर्मचारी परिस्थिती सहज हाताळू शकले असते आणि बळाचा वापर न्याय्य ठरू शकत नाही. त्यामुळे राज्याने या पोलिसांवर एफआयआर नोंदवणे आवश्यक आहे, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

# 'आंतरराष्ट्रीय परिषदे' निमित्त 'राज्यस्तरीय सहकार दिंड्या'

### ८ व ९ फेब्रुवारी रोजी शिर्डीत होणार परिषद, विविध कार्यक्रमांचे आयोजन

नगर – महाराष्ट्र शासन सहकार विभाग व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचे आयोजन केले आहे. १६ देश व भारतातील ८ राज्यांना निमंत्रण दिले असून या परिषदेस ८ ते १० हजार प्रतिनिधी उपस्थित राहतील असा प्राथमिक अंदाज आहे. महाराष्ट्रतील सहकारी पतसंस्थांची चळवळ ही जगातील सर्वात मोठी पतसंस्थांची चळवळ आहे. या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे स्वागत तसेच या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात भरगच्च कार्यक्रम महाराष्ट्रात साजरे व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या संचालक मंडळाच्या बैठकीत काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आलेले आहेत. त्यातील सर्वात महत्त्वपूर्ण निर्णय ८ व ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सहकारी पतसंस्थांची आंतरराष्ट्रीय परिषद महाराष्ट्रात संपन्न व्हावी असा निर्णय घेण्यात आला आहे.

ही आंतरराष्ट्रीय सहकार परिषद २ दिवसांची असेल. ८ तारखेला या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी येणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींचे स्वागत, तसेच इतर देशातील सहकारी पतसंस्थांची चळवळ, कार्यपद्धती, सहकार कायदा आणि भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील व या परिषदेला निमंत्रित केलेल्या भारतातील इतर ६ राज्यातील सहकारी पतसंस्थांची कार्यपद्धती, त्या राज्यातील सहकारी पतसंस्थांचे कायदे, कार्यपद्धती आदी विचारांचे आदान–प्रदान होणार आहे.

या प्रसंगी सहकार दिंडीचे आयोजन करण्यात आलेले आहे. पहिली दिंडी यशवंतराव चव्हाण यांच्या स्मारकाला अभिवादन करून सहकाराचे चळवळीचे जनक स्व. धनंजयराव गाडगीळ यांच्या नावाने मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या भागात भ्रमण करीतपश्चिम महाराष्ट्रतल्या कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर या जिल्ह्यांमधून भ्रमण करीत सहकार दिंडी पुण्यात येणार आहे. पुण्यातून ही दिंडी उत्तर महाराष्ट्र मार्गक्रमण करीत अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचे जनक स्व. विठ्ठलराव विखेपाटील यांच्या समाधीस अभिवादन करून येईल.

दुसरी दिंडी सहकाराचे जनक स्व. वैकुंठभाई मेहता यांच्या नावाने नागपूरहून प्रस्थान होऊन अमरावती, अकोला, बुलढाणा, चिखली, छत्रपती संभाजी नगर मार्गे धाराशिव, बीड, जिल्ह्यातून अहिल्यानगरकडे येईल. दिंडी १ स्व. धनंजयराव गाडगीळ व दिंडी २ स्व. वैकुंठभाई मेहता स्थ. विठ्ठलराव विखे पाटील ज्यांनी आशिया खंडातील पहिला सहकारी तत्त्वावरील साखर कारखाना काढला. त्यांची जन्म व कर्मभूमी असलेल्या लोणी (प्रवरानगर) त्यांच्या स्मारकाला अभिवादन करत या दोन्ही दिंडीचा संगम होईल. अभिवादन करून दोन्ही दिंडी शिर्डीकडे प्रस्थान करतील.

शिर्डी येथे ८ फेब्रुवारीला विविध देशातील सहकारी पतसंस्थांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत सुरू झालेल्या अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी ९ फेब्रुवारी सहकाराचे खुले अधिवेशन होणार आहे.

या खुल्या अधिवेशनाच्या शुभारंभ प्रसंगी या दोन्ही दिंडीचे आगमन कार्यक्रम स्थळी होईल. प्रसंगी आंतरराष्ट्रीय पाहुण्यांना महाराष्ट्रच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारा भव्य दिव्य असा कार्यक्रम सुरू असेल.

या दिंड्यांच्या स्वागतानंतर सहकारी पतसंस्था चळवळीतील तज्ञांचे विविध विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केली आहेत.

सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत ही मार्गदर्शन व्याख्याने व विविध प्रश्नांवर विचार विनिमय होईल. सर्वानुमते काही ठराव मांडण्यात येतील. सकाळच्या सत्रात मंजूर केलेले ठराव विविध मान्यवरांना सादर केले जातील, व त्यांचे मार्गदर्शनही घेतले जाईल.

सकाळच्या सत्रामध्ये परदेशातून व विविध प्रांतातून आलेल्या प्रतिनिधींचे देखील मार्गदर्शन सर्वांना ऐकायला मिळणार आहे.

दुपारच्या सत्रामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सहकार मंत्री, केंद्रीय सहकार राज्यमंत्री त्याचप्रमाणे सहकार खात्याशी संबंधित सहकार सचिव, सहकार आयुक्त यांचे मार्गदर्शन लाभणार आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी काकासाहेब कोयटे, वसंत लोढा, किसनराव लोटके, प्रशांत गायकवाड, शिवाजी कपाळे, वासुदेव काळे आदी उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### डायबिटीज रुग्णांसाठी फायदेशीर

ज्यांना शुगरचा त्रास असतो त्यांनी कच्च्या पपईचे सेवन करून रक्तात शर्कराच्या मात्रेला कमी करू शकता. यामुळे शरीरात इंसुलिनची मात्रा वाढते. त्याचप्रमाणे शरीरात नैसर्गिक साखरेचे प्रमाण वाढते. पपई पोटाशी निगडित समस्या दूर करते आणि शरीरातून विषारी पदार्थ बाहेर काढते. मात्र गर्भवती महिलेस पपई खायला देऊ नये.

## पाककला

### शाही खिचडी

**साहित्य** – ३ वाट्या दिल्ली राईस, दीड वाटी मुगाची डाळ, १ बटाट्याचे मध्यम काप, हिंग, हळद, १ वाटी मटार दाणे, २ कांदे, २ इंच आलं, तूप, १५-२० लसूण पाकळ्या, मिरच्या, दही, थोडे काजू, बदाम, बेदाणे, जिरे, मीठ, गरम मसाला आणि सुक्या मिरच्या.

**कृती** – खिचडी करण्याच्या आधी १ तास अगोदर डाळ व तांदूळ एकत्र करून धुवून ठेवावे. कांदे उभे पातळ चिरावे. पातेल्यात तूप तापवून काजू, बदाम, बेदाणे तळून घ्यावे. त्याच तुपात कांदा तळून घ्यावा. कांदा लालसर कुरकुरीत तळावा. आलं-लसणाची पेस्ट करावी. पातेल्यात तूप तापवून हिंग, जिरे, हळद, सुक्या मिरच्या आणि आलं-लसूण पेस्ट घालून हे सर्व जिन्नस परतावे. त्यात डाळ, तांदूळ, बटाटे, मटार दाणे टाकावेत. ते चांगले परतून तांदळाच्या दुप्पट पाणी घालावे. चवीनुसार त्यात मीठ, गरम मसाला घालून मंद आचेवर खिचडी शिजू द्यावी. खिचडी वाढताना ती गरमागरमच वाढावी.

## सौंदर्य

### केसांना चमक येण्यासाठी

स्नान करताना केसांत थोडेसे व्हिनेगर टाका व त्वरित धुवा. यामुळे केसांना चमक येईल आणि केसांचा रंग जास्त गडद होईल.

## सल्ला

स्नान करण्यापूर्वी पाण्यात काही थेंब लिंबाचा रस टाकून घ्या.

## वास्तू

आपल्या घराच्या दरवाजावर शुभचिन्हे म्हणजे स्वस्तिक, ॐ, गणपती, कुबेर यांची चित्रे लावावी. त्यामुळे बाहेरील अमानवी शक्तींपासून वास्तूसहीत सर्व कुटुंबियांचे रक्षण होते. देवघरात तुटक्या-फुटक्या वस्तू ठेवू नयेत. देवघराच्या वरती-खाली काहीही सामान ठेवू नये.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २१ जानेवारी २०२५

**कालाष्टमी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, चित्रा २३।३७, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : मनोबल व आत्मविश्वास वाढविणारी एखादी घटना घडेल.

**वृषभ** : व्यवसायातील आर्थिक महत्त्वाची कामे मार्गी लावू शकाल. सहकाऱ्यांशी वाद होण्याची शक्यता आहे.

**मिथुन** : मनोबल व आत्मविश्वास उत्तम राहील. जिद्द व चिकाटीने कार्यरत राहून कामे मार्गी लावू शकाल.

**कर्क** : महत्त्वाचे निर्णय घेण्याचे टाळावे. तांत्रिक वस्तू व वाहने जपून वापरावीत. हलगर्जीपणा अंगलट येईल.

**सिंह** : वैवाहिक सौख्य लाभेल. मानसिक प्रसन्नता लाभेल. बाहेरचे जेवण तब्येत बिघडण्यास कारणीभूत ठरेल.

**कन्या** : आजचा दिवस फायदेशीर ठरेल. आरोग्याच्या किरकोळ समस्या राहतील.

**तूळ** : व्यवसायात उधारी, उसनवारीची कामे यशस्वी होतील.

**वृश्चिक** : तुमच्या राहत्या जागेचे किंवा प्रॉपर्टीच्या जागेचे प्रश्न सोडवू शकाल.

**धनु** : हाती घेतलेल्या कामात यश मिळवाल. जिद्द व चिकाटी वाढेल. कुटुंबियांसमवेत वेळ घालवाल.

**मकर** : प्रॉपर्टीची कामे मार्गी लागतील. व्यवसायातील आर्थिक गुंतवणूक फायदेशीर. वाहने व उपकरणे बिघडतील.

**कुंभ** : रखडलेली कामे मार्गी लावू शकाल. आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील.

**मीन** : शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना दिवस चांगला जाईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

### वाचन

**आई :** बंड्या आज काय शिकवले शाळेत. **बंड्या :** लिहायला शिकवले.
**आई :** अरे वा छान! काय लिहिले?
**बंड्या :** काय माहीत? अजून वाचायला नाही शिकवले...

# जागतिक आश्चर्ये

### अजंठा लेणी मधील पेंटींग्स

लॉर्ड बुद्धाच्या पूर्वीच्या जीवनातील दृश्ये दाखविण्यात आली आहेत. पुरातन भारतीय जीवन पद्धती ही पक्षी, हत्ती, राजेमहाराजे, नृत्यांगना, महाराण्या व त्यांचे नोकरचाकर यांची रंगीत चित्रे अजिंठा लेण्यांमध्ये पहावयास मिळतात. बरीचशी चित्रे भिंतीवर पेंट केलेली आहेत. पेंट करण्यासाठी जे रंग वापरण्यात आले होते ते संपूर्णत: वनस्पती व झाडे झुडपे यापासून बनविलेले होते. हजारो वर्षे झालीत तरी त्या चित्रांचा रंग होता तसाच आजही आहे.

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०९६

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ■ | ४ | | ५ |
| ६ | | | ■ | ७ | | ■ | |
| | ■ | ८ | | | | ९ | |
| १० | ११ | | ■ | | ■ | | ■ |
| १२ | | | ■ | १३ | १४ | ■ | १५ |
| ■ | | ■ | १६ | ■ | १७ | | |
| १८ | ■ | १९ | | २० | | ■ | |
| २१ | | | ■ | २२ | | | ■ |

**आडवे शब्द :-** १) ज्याचे मोल करता येत नाही असे ४) तोंड; आनन ६) आश्चर्य; अचंबा ७) ताडकन फुटणारी एक वस्तू ८) दुर्दैवी; कमनशिबी १०) रबरापासून बनलेले १२) युवक; जवान; युवा १३) मोठी गोटी; वरचा भाग; आच्छादन १७) भरीव नसलेला; पोकळ; रिता १९) जिचा पती वारला आहे अशी स्त्री; विधवा २१) सर्व; सकल २२) विष; जहर; सापाचे विष

**उभे शब्द :-** १) सतत; अविरत; निरंतर २) नूतन; नवीन ३) मोबदला घेऊन घरकाम करणारी स्त्री ४) धाक; जरब; दरारा ५) बसक्या नाकाचा ७) काळ्या पाठीचे हरिण ९) दीन; गरीब ११) एक आसामी आडनाव; काँग्रेसचे एक दिवंगत अध्यक्ष – देवकांत +++ १४) कुटुंब; फॅमिली; खटले १५) आकाशातून जाणारे एक वाहन १६) हेतू; योजना १८) गंध; राहणे १९) संरक्षणासाठी रात्री केला जाणारा फिरता पहार २०) आच; ऊब ; उष्णता; शेक

### शब्दगंध क्र. ७०९५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| चौ | क | स | ■ | उ | पा | स | ना |
| र | स | वं | ती | ■ | य | ■ | का |
| स | ■ | ग | ज | व | द | न | ■ |
| ■ | मा | डी | ■ | ज | ळ | गा | व |
| सं | था | ■ | भा | न | ■ | रा | ड |
| जी | ■ | शी | त | ■ | त | ■ | वा |
| व | रा | त | ■ | सा | र | वा | न |
| न | व | ल | ■ | म | ल | म | ल |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : बुद्धी असणाऱ्यांजवळ सर्व काही असते; परंतु मूर्खांजवळ सर्व असूनही काहीच नसते. – **तिरुवल्लुवर**

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## पती-पत्नीचा रक्तगट एक असेल तर मुले व्हायला काही प्रॉब्लेम येतो का?

आपल्याकडे पत्रिका बघून एक नाडी असेल तर लग्नाला मनाई करतात. आणि त्यात किती तथ्य आहे आणि ही बाब वैज्ञानिक दृष्टीने किती बरोबर आहे याबद्दल मी काही सांगू शकत नाही. त्या बाबतीत तथ्यपूर्ण माहिती वाचायला आवडेल. मात्र ही समजूत आहे. मात्र यावर पण तोडगे अनेक ज्योतिषी सांगतात. एक नाडी आहे तरी अमुक केल्याने चालते वगैरे वगैरे. आपल्याकडे एक गोत्र असेल तर सहसा लग्न नाही करत. पण कारण एक गोत्र असेल तर एकाच पुरुषापासून व्युत्पत्ती झालेले आहे असे मानले जाते आणि मग ते बहीण भाऊ असे काहीसे नाते समजतात. पण वैज्ञानिक दृष्टीने साधारण ७ पिढ्या गेल्या की गुणसूत्रे बदलून जातात. त्यामुळे मूळ पुरुष एक असला तरी वेगवेगळ्या मूळ स्त्रिया त्यात सामील झाल्याने आणि स्त्रिया आपल्या अपत्यांना आपले mitochondrial DN देत असल्याने तो दोष ही नाहीसा होतो. अर्थात आपल्याकडे सगोत्री विवाह करतात, मुलीला मामाच्या मांडीवर देऊन. म्हणाजे आपल्या आईच्या गोत्रात जाऊन. अर्थात अर्धी आणि सुतभर अधिक ती मुलगी आईच्या गोत्रचीच असते ही बाब गौण समजून दुर्लक्ष करतात.

मात्र एक रक्त गट असेल तर काहीही फरक पडत नाही. मुले होण्यास काहीच अडचण नाही. अपत्याचा रक्त गट बहुतेक तोच राहील. रक्त गट आणि मुले होणे यांचा काहीच संबंध नाही. अर्थात, B, O आणि B हे रक्तगट. हे काहीही असू शकतात. पण Rh फॅक्टर हा एक मुद्दा महत्वाचा ठरतो. जर वडील Rh positive आणि आई Rh negative असेल आणि जर होणारे अपत्य Rh positive झाले तर पोटात असताना बाळाच्या रक्तातील Rh फॅक्टरच्या विरोधात आईच्या शरीरात antibodies निर्माण होतात. आणि मग दोघांच्याही आयुष्याला धोका निर्माण होऊ शकतो. जुन्या काळी जेव्हा हे माहीत नव्हते तेव्हा मुलींना खूप धोका असायचा. पण आजकाल रक्त तपासणी करून त्यासाठी औषध योजना करून हा धोका टाळता येतो. मात्र त्यासाठी आईचे रक्त तपासणे गरजेचे आहे.

जर ती स्वतः Rh positive असेल तर बाळ Rh negative चालते. फक्त आई negative असेल तर काळजी घ्यावी लागते. मग वडलांचे रक्त तपासण्यात येते. जर आई B + असेल, तर वडील B, B, की O + की काहीच फरक पडत नाही. पण आई B - असेल तर वडलांचा Rh factor तपासावा लागेल.

## कोल्ह्याची थाप

एक कोंबडा खुराड्यात राहत होता. एकदा फिरत-फिरत तो बराच दूर आला. आजूबाजूची शोभा पाहण्यासाठी तो एका कुंपणावर चढून बसला आणि मग आनंदाने ओरडू लागला असता त्याचा आवाज ऐकून पलिकडच्या वाटेने चाललेला कोल्हा तिथे आला. कोंबडा कुंपणावर बसलेला पाहताच तो आपल्या तावडीत सापडणार नाही, असे लक्षात येताच कोल्ह्याने एक युक्ती करण्याचे ठरविले.

भोळेपणाचा आव आणीत कोल्हा म्हणाला, ''काय मित्रा, कसा आहेस? तुला पाहून मला फार आनंद झाला. तुला कडकडून आलिंगन द्यावे, अशी माझी इच्छा आहे बघ. तेव्हा मित्रा, खाली उतरुन मला भेट गड्या,'' त्यावर कोंबडा वरुनच म्हणाला, ''कोल्हेदादा, मलासुद्धा तुम्हाला भेटायला आनंदच वाटला असता. तू माझा मित्र आहेस, म्हणून मला तुझी भीती वाटत नाही. पण मी खाली उतरल्यावर इतर प्राण्यांच्या तावडीत सापडलो, तर ते मला जिवंत सोडतील का? का उगीच मला संकटात लोटतोस? संकटात सापडण्यापेक्षा मी येथेच सुरक्षित आहे.'' त्यावर कोल्हा म्हणाला, ''अरे तुला भितीचे कसलेही कारण नाही. प्राणी आणि पक्षी यांच्यामध्ये तसा करार झाला आहे. जो कोणी कराराविरुद्ध वागेल, त्याला कडक शिक्षा होईल, असाही ठराव झाला आहे. ही गोष्ट तर सर्वांना समजली. मग तुलाच कशी कळली नाही?'' असे दोघांचे बोलणे चालू असता मध्येच कोंबडा वाकडी मान करुन दूरवर पाहू लागला असता कोल्हा म्हणाला,'' मित्रा, वाकडी मान करुन दूरवर काय बघतो आहेस? त्यावर कोंबडा म्हणाला, '' अरे भाऊ, तिकडून चार-पाच शिकारी कुत्रे इकडेच येताहेत, असे मला दिसते आहे.''


कोंबड्याचे हे बोलणे ऐकताच कोल्ह्याची पाचावर धारण बसली. मनात घाबरुन तो म्हणाला,'' अरे मित्रा, असे आहे तर मला येथून गेले पाहिजे. बरं, नमस्कार. हा मी निघालोच बघ.''

तेव्हा कोंबडा त्याला थांबवीत म्हणाला, ''अरे भाऊ, असे पळतोस कशाला? थोड्या वेळातच मी खाली उतरतो. तू मला कराराची जी गोष्ट सांगितलीस, ती जर खरी असेल, तर तुला भीती वाटण्याचे काही कारण नाही.''

त्यावर कोल्हा म्हणाला,'' नाही रे बाबा. असा करार झाला आहे हे जरी खरे असले, तरी तो कुत्र्यांना अजून समजला नसेल, तर ते मला ठार केल्याशिवाय सोडतील का?'' असे म्हणत कोल्ह्याने तेथून पोबारा केला.

तात्पर्य : शेरास सव्वाशेर भेटतो, हेच खरे.

# रहमते दर्शन (भाग – १)



हम अपने अंतर में झाँके, हम अंतर्मुख हों, ताकि उस नूर को देख सकें, उसे पहचान सकें, उसका अनुभव कर सकें; और वह तब होता है जब कोई महापुरुष हमें अंतर्मुख होने का तरीका बता देता है। आगे गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं :

**राम नामु अउवधु दीआ एका लिव लाई ।।**

यहाँ राम का मतलब है वह महापुरुष जो प्रभु से एकमेक है, जिसे परमात्मा ने खुद इस दुनिया में भेजा है। जो रमा हुआ नाम है, वह शब्द है, वह शब्द जो प्रभु से उत्पन्न हुआ, वह शब्द जिससे सारी सृष्टि की रचना हुई। जब उस नाम का अमृत हमें मिलता है, तो उससे हमारी attention (तवज्जोह) एक तरफ़ लग जाती है, परमात्मा की ओर लग जाती है।

### वे एक समाज सुधारक भी थे

**राम नामु अउवधु दीआ एका लिव लाई ।।**

जब हम किसी महापुरुष की शरण में जाते हैं, तो वे क्या करते हैं कि जो हमारा ध्यान सब तरफ जा रहा है : काम में जा रहा है. घर की तरफ जा रहा है, पैसा कमाने में जा रहा है, पढ़ने-लिखने में जा रहा है और सैर-सपाटे में जा रहा है, उसको वे इकट्ठा कर देते हैं। कहाँ इकट्ठा कर देते हैं ? दो भ्रू-मध्य, शिव-नेत्र पर, ताकि हम उस शब्द के साथ जुड़ सकें और हमारा सारा ध्यान उस शब्द में हो जाए; वह शब्द, जो परमात्मा के साथ है, वह शब्द, जो खुद परमात्मा है, ताकि हमारा ध्यान प्रभु में ही लीन रहे। इसीलिए बार-बार कहा जाता है कि जाप करो। किसका जाप करो? प्रभ के नाम का. ताकि हमारा ध्यान प्रभु की ओर हो। और प्रभु क्या है? वह शब्द है, वह नाम है, वह नूर है, जो हमें दो भ्रू-मध्य एकाग्र होकर, शिव-नेत्र पर एकाग्र होकर मिलता है।

गुरु अर्जनदेव जी महाराज हमें यही समझा रहे हैं कि जब हम एक पूर्ण सतुरु की शरण में आते हैं, तो वे हमें नाम के साथ जोड़ देते हैं, ताकि जो हमारी जिंदगी का मकसद है, उसको हम पूरा कर सकें। नहीं तो यह जिंदगी बेकार हो जाएगी और फिर से हम ८४ लाख जियाजून के चक्कर में पड़ जायेंगे। जैसे-जैसे हम शब्द के साथ जुड़ेंगे, वैसे-वैसे हमारे कर्म भी कटते चले जायेंगे और हम ऐसी अवस्था में पहुँच जायेंगे, जिसमें हमारे सभी कर्मों का भुगतान हो जाएगा और हम परमात्मा से एकमेक हो जायेंगे। आगे गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं :

वे यहाँ प्रार्थना कर रहे हैं कि ऐ राखनहार! ऐ रखवाले!

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

पीछे जगदीश भाई की योजना, मेहनत और सबको साथ ले चलने के विधान ही मूल कारण थे। इस कार्यक्रम के आर्किटेक्ट जगदीश भाई थे। उन्होंने सिर्फ प्लान बना कर नहीं दिया परन्तु उस प्लान को अमल में लाने के लिए खुद दिन-रात लगे रहते थे सबके साथ। वो सम्मेलन बहुत ही सफल रहा।

मैं जगदीश भाई को बहुत ही मिस करती हूँ। कई बार कोई बात मुझे समझ में नहीं आती है तो जगदीश भाई की याद बहुत आती है। किसी बात को समझाने में, कोई राय-सलाह देने में या किसी भी समस्या को कैसे विधिपूर्वक और युक्तियुक्त, बाबा की याद और ज्ञान के आधार से निवारण करना है, इसे बताने में वे बहुत माहिर थे। हरेक की बुद्धि अपनी-अपनी होती है लेकिन जगदीश भाई की बुद्धि ऐसी थी कि हर बात को स्टेप बाई स्टेप समझा कर, उस समस्या को जड़ सहित कैसे मिटायें- यह विधि बताती थी। टीचर्स ट्रेनिंग की

### दिमाग की शक्ती

फाउण्डेशन उन्होंने ही डाली। कैसे भाषण करना है, कैसे कोर्स देना है, कैसे मुरली पढ़नी है और कैसे उसकी गहराई में जाना है- इन सब बातों की वे ट्रेनिंग टीचर्स को दिया करते थे। वे टीचरों को ट्रेनिंग देनेवाले टीचर थे। वे टीचर बहनों को बहुत ऊँची दृष्टि से देखते थे। वे सदैव यही चाहते थे कि प्रत्येक टीचर बहन बाबा को रॉयल्टी से, उदात्त भाव से, दिव्यता से, सम्मान से और भव्यता से दुनिया के सामने प्रत्यक्ष करे।

जगदीश भाई जन्मजात मेधावी थे। उनका व्यक्तित्व एक महान् नायक का था। उनके गुण और योग्यतायें एक सम्पन्न चिन्तक और त्यागी के थे। वे ब्राह्मण जीवन का एक अति उत्तम उदाहरण थे। मैं यह मानती हूँ। कि उनका जीवन संगमयुगी ब्राह्मण जीवन जीनेवालों के लिए आदर्श है।

मेरे फादर और मदर को जगदीश भाई के प्रति बहुत सम्मान था। मुझे याद है जब हम पहली बार मधुबन आये थे उस समय जगदीश भाई भी यहीं थे। मेरे पिता जी के मन में अनेक प्रश्न थे कि इस दुनिया का परिवर्तन कैसे होगा? उसकी प्रक्रिया क्या और कैसी होगी आदि-आदि। बड़ी दीदी और दादीने जगदीश भाई को कहा था कि अंकल के साथ बैठो और उनके प्रश्नों को हल करो। निर्वैर भाई के आफ़िस में जगदीश भाई हमारे माता-पिता के साथ बहुत लम्बे समय तक बैठे थे।

जब अंकल बाहर आये तो अंटी (मेरी मम्मी) से कह रहे थे, वो भाई बड़े बुद्धिमान और अनुभवी हैं। उस पहली मुलाक़ात में ही पिता जी और जगदीश भाई के बीच, दो महान् बुद्धिजीवियों के बीच, वो अविनाशी भ्रातृप्रेम जाग्रत हुआ था और वो अन्त तक बढ़ता ही गया। उन दोनों के बीच विचारविमर्श बड़े ऊँचे स्तर के होते थे।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

त्याच पद्धतीने गूळ घालून रव्याची, बाजरीच्या पिठाची तूप टाकून पेज प्यावी. सकालने जेवण साधारणतः १२ ते १२.३० च्या दरम्यान तर रात्रीचे ७ ते ८ च्या दरम्यान करावे. या खाल्लेल्या अन्नाचे व्यवस्थित पचन होते व आमनिर्मिती होत नाही. जेवणामध्ये २ चपाती किंवा भाकरी पालेभाजी किंवा फळभाजी, १ वाटी मुगाची किंवा मटकीची उसळ, भात, वरण असा आहार घ्यावा. गाजर, काकडी, बीट, उकडलेले मूग यांची कोशिंबीर खावी. दिवसभर, सकाळ-संध्याकाळ या प्रमाणे २ ग्लास गरम दूधात शतावरी कल्प २ चमचे टाकून दूध प्यावे; यामुळे स्तन्यउत्पत्ती चांगली होते व बाळाचे पोषण चांगले होते. सूतिकेने पारंपरिक पद्धतीने बनविलेले खारीक, खोबरे, आळीव, गोडांबी व डिंकाचे लाडू रोज सकाळी अनशापोटी खावा; यामुळे कंबरदुखी, पाठदुखी कमी होते. बाळंतपणात झालेली हाडांची झीज भरून निघते. सूतिकेने आरोग्य चांगले राहावे;

### सूतिकेचा आहार

म्हणून आळीवाची खीर, मेथी घालून केलेले लाडू, ओले खोबरे, खजूर व जेवणामध्ये खसखशीची आमटी, मेथीची पातळ भाजी, कडधान्य यांचा समावेश करावा. सूतिकेचे जेवण बनविताना तेला ऐवजी साजूक तुपाचा वापर करावा, कारण तूप हे अग्नी प्रदीप्त करून पचनक्षमता वाढविणारे असते. सूतिकेने जेवणाची वेळ नियमित ठेवावी. सूतिकेने जेवणानंतर आहार पचविण्यासाठी व मुखशुद्धीसाठी बडीशेप, धनाडाळ, ओवा, तीळ, खोबरे, सैंधव हे सर्व पदार्थ भाजून त्यांचे मिश्रण करून ठेवावे व ते एक-एक चमचा बारीक चावून खावे; यामुळे जेवणाचे पचन व्यवस्थित होऊन वात सहजपणे सरतो. पोटात वात गुबारा धरत नाही. सुतिकेचे जेवण चवदार असावे; परंतु मसालेदार, तिखट, चमचमीत असे असू नये. सुतिकेचे जेवण कमी तिखट असावे. फळभाज्यांमध्ये दुधी भोपळा, घोसाळे, दोडके, पडवळ, कोहळा, लाल भोपळा या भाज्या प्रामुख्याने वापराव्यात. बाळाला स्तनपान करण्याआधी प्रत्येक वेळी थोडेफार खावे. उदा. शेंगदाणे, फुटाणे किंवा कपभर दूध प्यावे.

**काय खाणे टाळावे :**

मांसाहार, शिळे पदार्थ, फ्रीजमधील थंड पदार्थ, पेय, आंबट पदार्थ, उदा. दही हे टाळाव अति तेलकट, तिखट, आंबवलेले पदार्थ, मॅगी, पिझ्झा, पावभाजी अशा प्रकारचे फास्ट फूड टाळावे. दह्याच्या ऐवजी गोड ताजे ताक प्यावे. आयुर्वेदामध्ये सूतिकेच्या प्रकृती परीक्षणावरून ही आहारयोजना सांगितली आहे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



अभिनेते दीपक शिर्के यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ. उद्धव शिंदे. समवेत अभिनेत्री मीनाक्षी शेषाद्री, तृप्ती देसाई, डॉ. अविनाश सकुंडे.

# ८ वर्षांत ९ हजारांवर लोकांना मदत करणाऱ्या 'स्नेहबंध सोशल फौंडेशन'ला नॅशनल अॅवॉर्ड

### अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी स्वीकारला पुरस्कार

नगर – गेल्या आठ वर्षांत समाज्यातील असहाय, निराधार, गरीब, ज्येष्ठ नागरिक, मजूर, गरीब मुले अशा जवळपास ९ हजार जणांना गरजू वस्तू, शैक्षणिक साहित्य, आरोग्य शिबिरांतून वंचित यांच्यासाठी मदत करत असणाऱ्या व पर्यावरण संवर्धनासाठी १० हजारांवर झाडे लावणाऱ्या स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांना सामाजिक कार्यासाठीचा ग्लोबल 'लीडरशिप नॅशनल अॅवॉर्ड' २०२५ यांना पुणे येथे झालेल्या एका कार्यकमात प्रदान करण्यात आला.

पुणे येथील विमाननगर येथील शेरटॉन ५ माइल स्टोन येथे बॉलिवूड अभिनेते दीपक शिर्के, अभिनेत्री मीनाक्षी शेषाद्री यांच्या हस्ते, तर भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई, आयएचआरएओचे इंटरनॅशनल अध्यक्ष डॉ. अविनाश सकुंडे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा झाला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, 'मी माझ्या सहकार्यांच्या वतीने नम्रतेने आणि कृतज्ञतेने हा पुरस्कार स्वीकारतो. राजाश्रयाविना केवळ लोकाश्रयावर हि संस्था खऱ्या अर्थाने चालवली जाते. फौंडेशनद्वारे आम्ही ८ वर्षांत ९ हजारांहून अधिक लोकांना मदत केली आहे. स्नेहबंध कोणतीही अपेक्षा वा स्वार्थ न ठेवता सामाजिक उद्देशाने सामाजिक जबाबदारी पाडतो.

# आचार्यश्रींच्या पावन भूमीत आल्यावर नेहमीच अवर्णनीय आनंद मिळतो : महेंद्रऋषीजी म.सा.

नगर – श्रमण संघीय युवाचार्य महेंद्रऋषीजी म.सा. आदि ठाणा ३ यांचे सोमवारी सकाळी आचार्यश्रींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आनंदधामच्या भूमीत आगमन झाले. तत्पूर्वी सकाळी आनंदऋषीजी हॉस्पिटल जवळ श्रावक श्राविकांनी स्वागत करून आनंदधाम पर्यंत स्वागत मिरवणूक काढली. त्यांच्यासमवेत महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., हितेंद्रऋषीजी म.सा., धवलऋषीजी म.सा. आदि ठाणा ३, आलोकऋषीजी म.सा. यांच्यासह महासतीजी पुष्पाकंवरजी म.सा., दिव्यदर्शनाजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., विश्वदर्शनाजी म.सा., दिव्यज्योतीजी म.सा., रिद्धीमाजी म.सा. आदी साधूसाध्वीजी उपस्थित होते. मिरवणुकीत पुरुष भाविक सहभागी झाले होते. तसेच महिला भाविक डोक्यावर मंगलकलश व हातात अष्टमंगल फलक घेऊन सहभागी झाले होते. आनंदधाम येथे पुणे जिल्ह्यातील वडगाव मावळ येथे पूज्य महेंद्रऋषीजी म.सा.यांच्या सान्निध्यात १४ फेब्रुवारी रोजी दिक्षा घेणाऱ्या शिवम संदीप बाफना यांचा सन्मान करण्यात आला.



श्रमण संघीय युवाचार्य महेंद्रऋषीजी म.सा. आदि ठाणा ३ यांचे आनंदधाम येथे आगमन झाले. तत्पूर्वी आनंदऋषीजी हॉस्पिटल जवळ श्रावक श्राविकांनी स्वागत करून आनंदधाम पर्यंत स्वागत मिरवणूक काढण्यात आली.

आनंदधाम येथील स्वागतावेळी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत, उपाध्यक्ष आनंदराम मुनोत, सतीश लोढा, सेक्रेटरी संतोष बोथरा, संतोष गांधी, मनिषा मुनोत, अभय लुणिया, अनिल दुगड, रतिलाल कटारिया, अशोक (बाबूशेठ) बोरा, आनंद चोपडा, नितीन शिंगी, प्रितम गांधी, अमोल कटारिया यांच्यासह श्रावक संघाचे सदस्य, नगर, चाकण, पुणे, चेन्नई, अमरावती, नाशिक आदी उपस्थित होते.

आनंदधाम येथे भाविकांशी संवाद साधताना महेंद्रऋषीजी म.सा. म्हणाले, आचार्यश्रींच्या पवित्र पावन भूमीत आल्यावर नेहमीच अवर्णनीय आनंद मिळतो. देशात कुठेही असलो तरी मनात या आनंद धामची ओढ असते. येथील श्रावक श्राविकांचे धर्माचरचण पाहून मनाला प्रसन्नता लाभते. अहिल्यानगरची भूमी ही तपोभूमी आहे. येथील वातावरण नेहमीच ऊर्जा देते. आज याठिकाणी मावळ येथे होणाऱ्या दीक्षार्थीची प्रथम घोषणा करताना विशेष आनंद होत आहे.

कुंदनऋषीजी म.सा. म्हणाले, युवाचार्य आमच्यासाठी बंधूतुल्य आहेत. त्यांच्या आगमनाने विशेष आनंद मिळतो. नगरच्या भाविकांनाही त्यांच्या सान्निध्याची, मार्गदर्शनाची संधी मिळाली आहे.

हस्तीमल मुनोत म्हणाले, साधू संतांचे आगमन वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण करते. युवाचार्य महेंद्रऋषीजी म.सा. यांचे सान्निध्य मिळण्याचे भाग्य श्रावक श्राविकांना प्राप्त झाले आहे. भविष्यात जेव्हा त्यांना आचार्यपद मिळेल त्यानंतरचा पहिला चातुर्मास त्यांनी आनंदधाम येथे द्यावा, अशी श्रावक संघातर्फे आग्रही विनंती केली आहे.

तीन दिवस युवाचार्य आनंदधाम येथे असून भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. मावळ येथे होणाऱ्या दिक्षा सोहळ्याला जाऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी गाडीची व्यवस्था करण्यात येणार आहे. यासाठी आनंदधाम येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मुख्य प्रशासिका १०१ वर्षाच्या राजयोगिनी दादी रतन मोहिनीजी यांची बाबा मिलन कार्यक्रमादरम्यान डायमंड हॉल मध्ये भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या कार्यक्रमाला २०,००० हून अधिक साधक उपस्थित होते. यावेळी बीके डॉ. दीपक हरके उपस्थित होते.

# बडीसाजन ओसवाल श्रीसंघाच्या कार्यास कायम माझे मंगल आशीर्वाद

### युवाचार्य महेंद्रऋषीजी महाराज यांचे प्रतिपादन

नगर – बोथरा परिवार व बडीसाजन ओसवाल श्रीसंघाने समाजातील गरजूंसाठी घरकुल योजनेच्या इमारतीचे काम सुरु करून चांगला नवा पायंडा पाडून कौतुकास्पद काम केले आहे. याबद्दल सर्वांचे अभिनंदन. ही वास्तू कायम सकारात्मक उर्जा देणारी ठरणार आहे. इतर जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमापासून प्रेरणा घेऊन असे समाजाभिमुख काम करावे. समाजातील सर्वसामान्यांसाठी होणाऱ्या अशा उपक्रमांना कायम माझे मंगल आशीर्वाद आहेत, असे शुभाशीस श्रमण संघीय युवाचार्य महेंद्रऋषीजी महाराजांनी दिली.



युवाचार्य महेंद्रऋषीजी महाराज यांनी श्री बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या केडगाव येथील घरकुल प्रकल्पास भेट देऊन शुभाशीस दिले.

महेंद्रऋषीजी महाराज यांनी रविवारी सायंकाळी श्री बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या वतीने केडगाव येथे उभारण्यात येत असलेल्या घरकुल इमारतीच्या कामास भेट दिली. यावेळी श्री बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या वतीने जय हो विजय हो... महात्मा का विजय हो... अशा घोषणा देऊन युवाचार्य महेंद्रऋषीजी महाराज यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावेळी श्री बडीसाजन ओसवाल अध्यक्ष पेमराज बोथरा, उपाध्यक्ष अजित कर्नावट, सचिव विशाल शेटिया, खजिनदार मिलिंद जांगडा, सहखजिनदार दीपक बोथरा, सहसचिव अनिल लुंकड, संचालक सुमतिलाल कोठारी, धरमचंद कोठरी, पोपटलाल कटारिया, नरेंद्र चोरडिया, राजेंद्र ताथेड, नरेंद्र बाफना, राजेंद्र बोथरा, पोपट लोढा, मनोज शेटिया आदी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष पेमराज बोथरा यांनी युवाचार्य महेंद्रऋषीजी महाराज यांना घरकुल योजनेची माहिती देत सांगितले, गुरुदेवांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाने श्री बडीसाजन ओसवाल श्री संघाला समाजाभिमुख कामासाठी कायम उर्जा मिळत आहे. त्यामुळेच समजातील नागरिकांसाठी विविध योजना व उपक्रम सतत राबवून समाज सुदृढ करत आहेत. सर्व पदाधिकारी व संचालक संस्थेच्य प्रगतीसाठी झटत आहेत. समाजातील गरजू कुटुंबांसाठी येणारी ही घरकुलांच्या इमारतीच्या वास्तूचे काम दर्जेदार होत असून वास्तुशास्त्रानुसार होत आहे. येत्या दिवाळीपर्यंत काम पूर्णत्वास येणार आहे.

# संस्कार व शिक्षणाची जडणघडण शालेय जीवनात होते असते

### रामदास येवले यांचे प्रतिपादन; केडगावच्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

नगर – शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या भविष्याचा पाया रचला जातो. संस्कार व शिक्षणाची जडणघडण शालेय जीवनात होत असते. गरुडाची गोष्ट सांगून त्यांनी जीवनातील अपयश पचवून पुन्हा भरारी घेण्याचे आवाहन रामदास येवले यांनी केले. तर विद्यालयास पुन्हा एकदा उर्जित अवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरु आहे. विद्यालयाच्या सर्वांगीन प्रगतीसाठी सर्व संस्थाचालक प्रयत्नशील असून, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शालेय शिक्षक देखील योगदान देत आहे. अनेक गुणवंत विद्यार्थिनी या शाळेतून घडल्या असून, विद्यालयाची प्रगतीपथाकडे वाटचाल सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन समारंभ उत्साहात पार पडले. महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातील विद्यार्थ्यांनीचा सांस्कृतिक कार्यक्रम रंगला होता. विद्यार्थ्यांनीनि एकापेक्षा एक सरस सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. उपस्थित प्रेक्षक व पालकांनी त्यांना टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.




केडगावच्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले.

संचालक राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे रामदास येवले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे सचिव बबनराव कोतकर, संस्थेचे अध्यक्ष रमेश गवळी, उपाध्यक्ष जाफर शेख, खजिनदार प्रल्हाद साठे, रावसाहेब सातपुते, जयद्रथ खाकाळ, डॉ. सुभाष बागले, जयश्री कोतकर, मनीषा थोरात, छाया सुंबे, ज्ञानदेव बेरड, नंदेश शिंदे, संजयकुमार निक्रड, मुख्याध्यापिका वासंती धुमाळ, सखाराम गारुडकर, रेणुका म्हस्के, भारती गुंड आदींसह शालेय शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बबन साळवे यांनी केले. सूत्रसंचालन जालिंदर सातपुते व जयश्री कोतकर यांनी केले. आभार सखाराम गारुडकर यांनी मानले. स्नेहसंमेलन यशस्वी होण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# चित्र शिल्पकार प्रमोद कांबळे यांना अभिनव जीवन गौरव पुरस्कार जाहीर

नगर – चित्र शिल्पकार प्रमोद कांबळे यांना अभिनव जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. पुण्यातल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे ऑडिटोरियममध्ये या पुरस्काराचे वितरण २१ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे.



महाराष्ट्र शासन अनुदानित भारतीय कला प्रसारिणी सभेच्या अभिनव कला महाविद्यालयाच्या वार्षिक कला प्रदर्शन कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

या महाविद्यालयात मूलभूत अभ्यासक्रमाबरोबरच रेखा कला आणि रंग कला उपयोजित कला कला शिक्षक पदविका डिप्लोमा इन आर्ट एज्युकेशन असे अभ्यासक्रम शिकवले जातात. त्यामुळे या महाविद्यालयाच्या वार्षिक कला प्रदर्शनासाठी विविध स्तरातून कलाप्रेमी विद्यार्थी उपस्थित असतात.

महाविद्यालय दरवर्षी कलाक्षेत्रात आपले अलौकिक असे योगदान देणाऱ्या कलाकाराला जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविते यावर्षी यासाठी प्रमोद कांबळे यांची निवड करण्यात आली आहे त्याबाबतचे पत्र प्राचार्य राहुल भीमराव बळवंत यांनी कांबळे यांना दिले आहे.



मेकअप आर्टिस्ट कावेरी कैदके यांचा सावित्री ज्योती पुरस्काराने गौरव करण्यात आला.

# मेकअप आर्टिस्ट कावेरी कैदके यांचा 'सावित्री ज्योती पुरस्कारा'ने गौरव

नगर – महिला सक्षमीकरणासह सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या शहरातील आंतरराष्ट्रीय मेकअप आर्टिस्ट कावेरी कैदके यांना राज्यस्तरीय सावित्री ज्योती पुरस्काराने गौरविण्यात आले. सावित्री ज्योती महोत्सवात खासदार निलेश लंके यांच्या हस्ते कैदके यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. पाईपलाइन रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी स्वागताध्यक्ष तथा माजी नगरसेवक किशोर डागवाले, डॉ. रमेश वाघमारे, प्रा. हर्षल आगळे, सुहासराव सोनवणे, रजनी ताठे, अॅड. शारदाताई लगड, सिनेकलाकार राजेंद्र गटणे, संयोजिका जयश्री शिंदे, मुख्य संयोजक अॅड. महेश शिंदे, रामदास फुले आदी उपस्थित होते.

कावेरी कैदके यांनी अतिशय कमी वयामध्ये दुबई, थायलंड, पुणे आदी ठिकाणाहून ब्युटी क्षेत्रातील अद्यावत ज्ञान आत्मसात केलेले आहे. सौंदर्यशास्त्र मध्ये पारंगत होऊन अनेक मुलींना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी त्यांना सातत्याने पार्लरचे प्रशिक्षण त्या देत आहेत.

अहिल्या फाउंडेशनच्या त्या संस्थापिका अध्यक्षा असून, त्यांच्या मातोश्री सुवर्णा कैदके व आंतरराष्ट्रीय मेकअप आर्टिस्ट अलका गोविंद यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करत आहे. संस्थेमार्फत गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत, ग्रामीण भागातील महिलांची मोफत आरोग्य तपासणी व उपचार, ब्युटी टॅलेंट शो, ब्युटी क्षेत्रातील तज्ञांचे सेमिनार, वस्तीगृहातील मुलींना मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण, तसेच स्वच्छता अभियान, मतदार जागृती, वृक्षारोपण व संवर्धन आदी विविध सामाजिक कार्य त्या करत आहेत. महिलांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना सावित्री ज्योती पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# शिवसेनेच्या विचाराने मराठी माणसांचा वारसा पुढे घेऊन जाण्याचे कार्य एकनाथ शिंदे करत आहे

### आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चषक इंडियन ओपन रिपब्लिक कप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेला प्रारंभ

नगर – कराटे खेळाला देशभरातून प्रतिसाद मिळत आहे. या खेळाला महत्त्व प्राप्त झाले असून, अनेक खेळाडू पुढे येत आहे. राज्य स्पर्धेत यश संपादन करुन राष्ट्रीय स्पर्धेत गेलेल्या खेळाडूंना शासकीय नोकरी मिळत आहे. वेगवेगळ्या खेळाला करियर म्हणून निवडण्याची खेळाडूंना संधी आहे. कराटे खेळातील खेळाडूंना शासकीय नोकरी मिळेल, या हेतूने प्रयत्न करण्याची गरज असल्याचे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चषक इंडियन ओपन रिपब्लिक कप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेला प्रारंभ करण्यात आला.

शहरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चषक इंडियन ओपन रिपब्लिक कप कराटे चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेला रविवारी (१९ जानेवारी) उत्साहात प्रारंभ झाले. शिवसेना, युथ कराटे फेडरेशन, स्पोर्ट्स ओके व अहिल्यानगर रुरल अॅण्ड अर्बन कराटे असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने वाडियापार्क क्रीडा संकुल येथील बॅडमिंटन हॉलमध्ये कराटेचा थरार नगरकरांना अनुभवयास मिळाला. महाराष्ट्रातील खेळाडूंनी विविध गटात पदकाची कमाई करुन आघाडी घेतली आहे. तर द्वितीय स्थानी गुजरातची आघाडी आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र व राज्य बाहेरून १५ संघांसह ८३० खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे.

आमदार संग्राम जगताप यांनी रविवारी सकाळी स्पर्धेच्या ठिकाणी भेट देऊन खेळाडूंची लढत लावून स्पर्धेला प्रारंभ केले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहर प्रमुख सचिन जाधव, युवा सेनेचे शहर प्रमुख पै. महेश लोंढे, राज्य क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरांगे, माजी नगरसेवक मुद्दसर शेख, कराटे असोसिएशनचे साहिल सय्यद, सबिल सय्यद, सरफराज सय्यद, अमोल काजळे, ओमकार शिंदे आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रारंभी राष्ट्रगीताने स्पर्धेचा प्रारंभ झाला. अनिल शिंदे व सचिन जाधव यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. आमदार जगताप यांच्या हस्ते स्पर्धेच्या पंचांचा सत्कार करण्यात आला. सबिल सय्यद यांनी स्पर्धेची माहिती दिली.

तर स्व. बाळासाहेब ठाकरे, स्व. आनंद दिघे यांच्यानंतर शिवसेनेच्या विचाराने मराठी माणसांचा खरा वारसा पुढे घेऊन जाण्याचे कार्य राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे करत आहे. सर्वसामान्यांना आधार देण्याचे काम करत असल्याने त्यांचा चाहता वर्ग निर्माण झाला आहे. २४ तास उपलब्ध असलेला नेता, जनसेवेचा वसा घेऊन काम करत आहे. त्यांचे विचार पुढे घेऊन जाण्याचे कार्य या स्पर्धेतून होणार असल्याची भावना आमदार जगताप यांनी व्यक्त केली.

सचिन जाधव म्हणाले की, शिवसेनेने नेहमीच राजकारण करताना समाजकारणाचा वसा जपलेला आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतून खेळाडूंना चालना मिळणार आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने राजकारणाला समाजकारणाची जोड देऊन राज्यासह शहरात उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे योगदान सुरु असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसीम शेख यांनी केले. आभार सरफराज सय्यद यांनी मानले.

स्पर्धेसाठी खेळाडूंसह पालक वाडियापार्कमध्ये दाखल झाले होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# आयुक्त, चमकोगिरी थांबवून प्रत्यक्ष फिल्डवर काम दाखवा अन्यथा दालनात कुत्रे सोडणार


मनोज कोतकर

नगर – शहर व उपनगरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. गुलमोहोर रोडवर कोहिनूर मंगल कार्यालयासमोर भटके कुत्रे गाडीला आडवे आल्याने दोन युवती जखमी झाल्या. याच परिसरात मोकाट कुत्र्यांनी तीन वर्षांच्या बालकावर हल्ला केला. नागरिकांच्या सतर्कतेने सुदैवाने मोठी दुर्घटना टळली. केडगाव सोनेवाडी रोड परिसरातील सहा नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतला. रात्रीच्या वेळी तर शहर व उपनगरात कुत्र्यांच्या झुंडींमुळे नागरिकांना घराबाहेर पडताना दहा वेळा विचार करावा लागतो आहे. शहरात मोकाट कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे. अशा वेळी मनपा प्रशासन, विशेषतः मनपा आयुक्त यशवंत डांगे हे फक्त पाणी पट्टी दरवाढ तसेच इतर कामांत व्यस्त आहेत. नागरिकांकडून कर जरूर घ्या पण त्यांना मुक्त वातावरणात राहण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण केली पाहिजे. भटक्या कुत्र्यांना आवर घालण्यासाठी मनपा फक्त कागदी घोडे नाचवत आहे. आयुक्त साहेबांनी सोशल मीडिया, प्रसार माध्यमांवरील चमकोगिरी थांबवून प्रत्यक्ष फिल्डवर काम करून दाखवले पाहिजे. अन्यथा तुमच्या दालनासह महापालिकेच्या आवारात भटकी कुत्री सोडून आंदोलन केले जाईल असा इशारा माजी स्थायी समिती सभापती मनोज कोतकर यांनी दिला आहे.

लोकनियुक्त नगरसेवक नसल्याने अहिल्यानगर महानगरपालिकेत सध्या प्रशासक राज आहे. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्याकडे सर्व अधिकार आहेत. कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून त्यांनी ओळख निर्माण केली आहे. परंतु त्यांची कडक शिस्त मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करताना दिसून येत नाही. मोकाट कुत्र्यांमुळे शहर व उपनगरातील नागरिक भयभीत झाले आहेत. रात्रीच्या वेळी बाहेर गावाहून येताना नगरकरांना चोर, दरोडेखोरांपेक्षा कुत्र्यांची भीती वाटते. आयुक्त साहेब अनेक वेळा रस्त्यावर उतरून कामे मार्गी लावतात. त्याची योग्य प्रसिद्धी होईल अशी व्यवस्था केली जाते. आयुक्तांनी एकदा कोणताही लवाजमा न घेता शहर किंवा उपनगरात एकट्याने रस्त्यावर फिरून दाखवावे. म्हणजे त्यांना मोकाट कुत्र्यांची दहशत दिसून येईल. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी मनपाने कोणालाही काम द्यावे. तुमच्या पातळीवर निविदा प्रक्रिया राबवा परंतु हा उपद्रव बंद करावा. पाणीपट्टी दरवाढ करण्यासाठी तुम्ही खूप तत्परता दाखवली. तीच तत्परता नगरकरांना चांगल्या सुविधा देण्यासाठी दाखवली तर तुमचे कौतुकच होईल. येत्या आठ दिवसांत भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त न केल्यास आम्ही कुत्री पकडून आणून महापालिकेच्या आवारात सोडू असा इशारा मनोज कोतकर यांनी दिला आहे.

# अहिल्यानगर महापालिकेत सर्व प्रकारच्या ‘पाळीव प्राण्यांची नोंद’ करणे ‘बंधनकारक’

### जुन्या मनपा कार्यालयातील आरोग्य विभागात अर्ज उपलब्ध; आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांची माहिती



नगर – महाराष्ट्र महापालिका अधिनियमानुसार शहरातील कोणत्याही व्यक्तीला आपल्या राहत्या घरी कोणताही प्राणी पाळायचा असेल, तर त्या प्राण्याची नोंदणी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे करणे बंधनकारक आहे. केवळ कुत्रीच नव्हे; तर परवानगी असलेला कोणताही प्राणी पाळण्यासाठी हा परवाना असणे बंधनकारक आहे. अहिल्यानगर शहरात बहुसंख्य प्राणीप्रेमींना याची माहिती नसल्याने पाळीव प्राण्यांसाठी परवाना घेतला जात नाही. पाळीव प्राण्याबद्दल एखादी तक्रार आल्यास कारवाईची तरतूदही आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांनी त्यांच्याकडील पाळीव प्राण्यांची नोंद आरोग्य विभागात करून घ्यावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

महानगरपालिकेत पाळीव प्राण्यांच्या परवान्यासाठी आवश्यक बाबींची पडताळणी झाल्यानंतर परवाना, तसेच टोकन दिले जाते. परंतु, असा परवाना घ्यावा लागतो, याचीच कल्पना बहुसंख्य प्राणीप्रेमींना नसल्याने पाळीव प्राण्यांच्या संख्येच्या तुलनेत पाळीव प्राण्यांसाठी परवाना घेतलेल्यांची संख्या अतिशय कमी असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पाळीव प्राण्यांसाठी परवाना न घेतलेल्या नागरिकांबाबत माहिती घेऊन त्यांच्याकडून ही प्रक्रिया पूर्ण करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच याबाबत व्यापक जागृतीही केली जाणार आहे.

केंद्र सरकारने २०३० पर्यंत देश रेबीजमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार देशभर कार्यवाही केली जात आहे. पाळीव प्राण्यांची नोंदणी व परवान्याचे नूतनीकरण या वेळी संबंधित प्राण्याच्या लसीकरणाचा पुरावाही सादर करावा लागतो. त्यातून पाळीव प्राण्यांच्या लसीकरणाची स्थिती महापालिकेला समजते. मात्र, परवाना काढणे आणि त्याचे नूतनीकरण या दोन्ही बाबत उदासीनताच असल्याने बाधित कुत्रे चावल्यास रेबीजचा धोका संभवतो. त्यामुळे नागरिकांनी पाळीव प्राण्यांचे लसीकरण व नोंद दोन्ही आवश्यक आहे.

नागरिकांना पाळीव प्राण्यासाठी परवाना घ्यायचा असेल, तर जुन्या महानगरपालिकेतील आरोग्य विभागाच्या कार्यालयात अर्ज करावा लागतो. अर्जासोबत अर्जदाराचा रहिवासी पुरावा, पाळीव प्राण्याचे पासपोर्ट आकाराचे तीन फोटो, रेबीज इंजेक्शन दिल्याच्या प्रमाणपत्राची प्रत; तसेच मिळकतकर भरल्याचा पुरावा जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत दहा वर्षांसाठी शुल्क एकावेळी स्वीकारले जाते. मात्र, यानंतरही दर वर्षी कार्यालयात नूतनीकरण करून घेणे बंधनकारक आहे. पाळीव प्राण्याबद्दल कोणाकडून तक्रार आल्यास संबंधित पाळीव प्राण्यासाठी परवाना घेतलेला नसेल तर महापालिका कारवाई करू शकते. त्यामुळे पाळीव प्राण्याची नोंद महानगरपालिकेकडे करणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. सध्या ही प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीने आरोग्य विभागाच्या कार्यालयांमध्ये जाऊन अर्ज व पुरावे सादर करून करावी लागते. ही प्रक्रिया ऑनलाइन उपलब्ध करण्याचे काम सुरू असून, लवकरच ऑनलाइन माध्यमातूनही ही सुविधा उपलब्ध होईल, असे यशवंत डांगे यांनी सांगितले.

# छत्रपती संभाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे पंधरा दिवसात बसवण्याच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे


छत्रपती संभाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे १५ दिवसात बसवण्याच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

नगर – अहिल्यानगर शहरात स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे पुतळ्याचे अनावरण लवकरात लवकर करण्यात यावे या मागणीसाठी आंबेडकरी चळवळीच्या वतीने मनपा कार्यालयासमोर आमरण उपोषण चालू करण्यात आले असून या विविध मागण्या मनपा प्रशासनाने मान्य करत लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषणकर्ते अशोक गायकवाड व विजय भांबळ यांना लेखी पत्र देऊन नारळ पाणी देण्यात आले. यावेळी मनपा आयुक्त यशवंत डांगे, निवृत्ती आरु, एन. एम. पवळे, आरिफ शेख, अमित काळे, विनोद भिंगारदिवे, सुजित घंगाले, उत्तमराव साठे, बापू गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, प्रा.भिमराव पगारे, निलेश तोरणे, छानराज क्षेत्रे, राजू वाघ, यादव भिंगारदिवे, शरद गाढवे, अमोल अल्हाट, सागर अल्हाट आदीसह आंबेडकरी चळवळीचे पदाधिकारी उपस्थित होते.

लेखी पत्रात म्हटले आहे की, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याची फिनिशिंग राहिलेली असून ती झाल्यानंतर लवकरात लवकर पुतळा उभारण्यात येईल तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्याबाबत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून येत्या १५ दिवसात पुतळा उभारण्याची तातडीने कार्यवाही करण्यात येईल तसेच मार्केट यार्ड चौकातील पूर्णकृती पुतळा उभारल्यानंतर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्धकृती पुतळा योग्य जागी स्थापना करण्याबाबत बैठक घेऊन योग्य ठिकाणी स्थलांतर करण्यात येईल व अहिल्यानगर शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची पुनर्बांधणी करून सुसज्ज ग्रंथालय अभ्यासिका उभारणी करण्याचा आराखडा महापालिकेचे प्रकल्प सल्लागार स्पनेक्स ए.इ.सी.सोल्युशन प्रा. लिमिटेड पुणे यांनी तयार केला असून निधीची मागणी केलेली आहे. निधी उपलब्ध झाल्यानंतर लवकरात लवकर पुढील कारवाई करण्यात येईल. अहिल्यानगर मधील सामाजिक न्याय भवन इमारतीचे प्रवेशद्वार व संरक्षण भिंतीचे कामाबाबत मंजूर विकास योजनेनुसार असणारा १८ मीटर रस्ता असून तो १२ मीटर करण्याची मागणी आहे. प्रत्यक्ष जागेवर सर्व संबंधित खात्यासह अधिकारी पाहणी करून १५ दिवसात निर्णय घेऊन संरक्षण भिंत बांधण्याची कार्यवाही करण्यात येईल तसेच प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम अल्पसंख्यांक विभाग भारत सरकार यांचे योजनेतून महापालिकेच्या पिंपळगाव तलावाजवळील जागेत मेडिटेशन हॉल ध्यानधारणा केंद्र उभारण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिल्यामुळे उपोषण मागे घेण्यात आले.

# मुलांमधील कलागुण समजण्यासाठी स्नेहसंमेलनाची गरज : दिनकर टेमकर


डॉ. शरद कोलते इंग्लिश मिडीयम स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये कला सादर करताना विद्यार्थिनी.

नगर – लहान वयातच मुलांमधील गुण समजल्यास पुढील आयुष्यात त्याच्यावर अधिक मेहनत घेऊन मुलांना योग्य मार्गदर्शन करणे सोपे जाईल त्यासाठी शाळेत स्नेहसंमेलन आवश्यकता असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर यांनी केले.

पारगांव येथील डॉ. शरद कोलते इंग्लिश मिडीयम स्कूल वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव प्रा. विजय शिंदे, उपाध्यक्ष अशोक शिंदे, पंचायत समिती नगरचे विषय तज्ञ सुधीर लांडगे, प्रियदर्शनी शाळेचे संचालक बाळासाहेब खोमणे, पालक, नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

शिंदे यांनी प्रास्ताविकात शाळेच्या वार्षिक अहवाल तसेच भविष्यातील योजना याबद्दल माहिती दिली. ग्रामीण भागातील शाळा असल्याने आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते आणि म्हणूनच लवकरच याठिकाणी स्वयंरोजगार व कौशल्य विकास केंद्राची स्थापना करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील गीते पाळणा, देशभक्तीपर गीते तसेच विविध गाणी सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. यावेळी अनेक उत्कृष्ट काम काम करण्याऱ्या शिक्षकांचा टेमकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी होण्यासाठी ईश्वर तनपुरे, सुनिता तनपुरे, रेश्मा शेख, स्वाती वायकर, कीर्ती मगर, निकिता तनपुरे यांनी विशेष प्रयत्न केले. सूत्रसंचालन सुनिता तनपुरे व रेश्मा शेख यांनी केले तर आभार स्वाती वायकर यांनी मानले.


भुतकरवाडीमधील श्रीराम ज्योतिष कार्यालय आयोजित रेकी प्रशिक्षण वर्गास प्रतिसाद मिळाला.

# रेकी प्रशिक्षण वर्गास नगरमधून प्रतिसाद

नगर – भुतकरवाडीमधील श्रीराम ज्योतिष कार्यालय आयोजित रेकी प्रशिक्षण वर्गास प्रतिसाद मिळाला. यामध्ये १५ ते ८० वयोगटातील विद्यार्थी, गृहिणी, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, योग प्रशिक्षक, पुरोहित अशा विविध क्षेत्रामधील जिज्ञासूंनी सहभाग घेतला होता.

रेकी म्हणजे वैश्विक प्राणशक्ती होय. यालाच हस्तस्पर्श विद्या असेही म्हणतात. शारीरिक, मानसिक, आर्थिक, भावनिक अशा सर्व स्तरांवरील प्रगतीसाठी रेकी उपयुक्त ठरते. घरच्या घरी सहजपणे करता येणारे रेकी उपचार अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक आहेत, हे प्रशिक्षण वर्गात सहभागी झालेल्या सर्वांनी अनुभवले. रेकीचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण आपल्या कुटूंबाच्या आरोग्य रक्षणाचे कार्य करू शकते, अशी प्रतिक्रिया वर्गात सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थींमधून उमटली.

रेकी ग्रँडमास्टर शितल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण वर्ग पार पडला. रेकी उपचार करून आपले, कुटूंबाचे आणि समाजाचे आरोग्य सांभाळा, असे आवाहन शितल देशमुख यांनी केले.

# वाचनामुळे बुध्दीबरोबरच व्यक्तिमत्व विकास

### डॉ. रेखाराणी खुराणा यांचे प्रतिपादन; डॉ.पाऊलबुधे फार्मसीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा साजरा


महाराष्ट्र शासनातर्फे वाचन संकल्प उपक्रम डॉ.ना.ज. पाऊलबुधे फार्मसी कॉलेजमध्ये राबविण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात नवनवीन साहित्याचे वाचन केले. (छाया – विजय मते)

नगर – सोशल मीडियाच्या युगात सध्याचा तरुण वाचनाकडे दुर्लक्ष करीत आहे. केवळ यांत्रिक युगात जगणे पसंत करत आहेत. तुम्हाला वाचनामुळे सखोल ज्ञान प्राप्त होत असते.वाचनामुळे नवनवीन साहित्याची ओळख होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम हाती घेतला आहे. वाचनामुळे बुद्धीबरोबरच आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो तेव्हा आजच्या तरुणांनी वाचनाकडे वळावे, असे आवाहन डॉ.रेखाराणी खुराणा यांनी केले आहे.

वसंत टेकडी जवळील डॉ.ना.ज. पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम पार पडला यावेळी प्रमुख पाहुणे डॉ.रेखा राणी खुराणा, बी फार्मसी चे प्राचार्य डॉ. श्याम पांगा, डी फार्मसीचे प्राचार्या अनुराधा चव्हाण, ग्रंथपाल स्वाती कडनोर विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ.खुराणा यांनी विद्यार्थ्यांनी वाचनाकडे कसे वळावे, वाचनामुळे आपल्या बुद्धीचा विकास कसा होतो त्या साठी जास्तीत जास्त लायब्ररीचा उपयोग कसा करावा रिसर्च संदर्भ ग्रंथ कसे हाताळावे याबाबत मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ.श्याम पांगा यांनी मार्गदर्शन करताना वाचन संस्कृतीच्या विकासाने तरुणाच्या व्यक्तिमत्त्वाचे भरण पोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते, असे संगितले.

ग्रंथपाल स्वाती कडनोर म्हणाल्या अलीकडच्या काळात देशातील तरुण वाचन संस्कृती पासून दुरावत चालले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित होण्याची गरज व आवश्यकता आहे. त्यासाठी आपण हा वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम राबविला आहे.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी नवनवीन पुस्तकांचे वाचन केले संदर्भ ग्रंथांचे अभ्यास करून समजावून घेतले सामूहिक वाचन केले पुस्तक कथन केले पुस्तक परीक्षण केले. विद्यार्थ्यांना नव साहित्यांची ओळख करून दिली. डी फार्मसीच्या प्राचार्य अनुराधा चव्हाण यांनी सर्व विद्यार्थ्यांनी या प्रकल्पात सहभाग घेतला. सामूहिक वाचन केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. अशाच प्रकारे लायब्ररीत मोठ्या प्रमाणात वाचन करत रहा. पुस्तकाचे महत्व त्यांना सांगितले.

विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाचे ही आभार मानले. अशा प्रकल्पाची खरोखर गरज आहे, असे प्रकल्प जर वेळोवेळी राबविले तर खरोखर विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होईल. शाळा, महाविद्यालय जागृत होतील, असे प्राचार्या अनुराधा चव्हाण यांनी सांगितले.

# जेसीबी चोरला; गुन्हा दाखल

नगर – नगर पुणे रोडवरील कामरगाव येथील दुकानासमोर लावलेला २८ लाख रूपये किमतीचा जेसीबी चोरून नेल्याच्या आरोपावरून तिघांविरूध्द नगर तालुका पोलीस ठाण्यात १८ जानेवारीला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीकृष्ण आदिनाथ गोसावी (वय ४२ रा. इंदुलोन्स, सिंहगड कॉलेज, आंबेगाव बीके, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. मिना बाळासाहेब दळवी (मुळ रा. राळेगण म्हसोबा, ता. नगर, हल्ली रा. सुवर्ण पार्क, एलएमडी रस्ता, पुणे), चंद्रकांत पाडेकर (पूर्ण नाव माहिती नाही, रा. कामरगाव, ता. नगर) व गोरख उबाळे (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. संशयित आरोपींनी आपला आर्थिक फायदा साधण्यासाठी जाणीवपूर्वक आणि लबाडीच्या इराद्याने फिर्यादीच्या मालकीचा जेसीबी चोरून नेला. असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार रवी सोनटक्के अधिक तपास करत आहेत.

# बाहेरगावी गेलेल्या कुटुंबाचे घर फोडून चोरी

### सोन्याचे दागिने व रोकड लंपास, सावेडी उपनगरातील घटना

नगर – घर बंद करून पुणे येथे गेलेल्या व्यक्तीचे घर चोरट्यांनी फोडून २२ ग्रॅम सोन्याचे दागिने, तीन हजाराची रोकड असा ५६ हजाराचा ऐवज चोरून नेला. सावेडीतील निर्मलनगर परिसरात १६ जानेवारीच्या पहाटे पाच ते १७ जानेवारीला दुपारी साडेबाराच्या दरम्यान ही घटना घडली.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात शनिवारी घरफोडीचा गुन्हा दाखल झाला आहे. ज्योती निर्मलचंद्र थोरात (वय ५८ रा. मुळे, एसटीडी कॉलनी, निर्मलनगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचे पती गुरूवारी पुणे येथे मुलाकडे गेले होते. ते पुणे येथे असताना शुक्रवारी दुपारी दुपारी १२:३० वाजता शेजारी राहणारे शुभाशचंद्र वामन यांनी फिर्यादींना फोन करून घराचा दरवाजा उघडा असल्याची माहिती दिली.

फिर्यादी पुण्याहून घरी परतल्यानंतर पाहिले असता दरवाजाचा कडीकोंडा तुटलेला दिसला. घरातील कपाटांची दरवाजे उघडी होती, आणि सामान अस्ताव्यस्त पडले होते. कपाटाच्या लॉकरमधील सोन्याचे दागिने, पावत्या व रोख रक्कम चोरीस गेल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# नेप्ती नाका परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – येथील नेप्ती नाका परिसरातील एका रूग्णालयात उपचार घेण्यासाठी आलेल्या एका अल्पवयीन मुलीला (वय १७) अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना १८ जानेवारीला सायंकाळी घडली. पीडित अल्पवयीन मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

मुलीची तब्येत खराब असल्याने फिर्यादीने तिला १८ जानेवारीला सायंकाळी सहाच्या सुमारास नेप्ती नाका येथील एका रूग्णालयात नेले. डॉक्टरांकडून तपासणी केल्यानंतर औषधे आणण्यासाठी फिर्यादी मेडिकलमध्ये गेल्या असता मुलगी रूग्णालयाच्या पायरीवर बसलेली होती. मात्र, औषधे घेऊन परत आल्यावर फिर्यादीला मुलगी तिथे दिसली नाही. त्यांनी परिसरात व नातेवाईकांकडे शोध घेऊनही मुलगी मिळून न आल्याने त्यांनी पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करून शोधमोहीम सुरू केली आहे.

# दुचाकीची चोरी

नगर – दुकानासमोर रस्त्याच्या कडेला हँडेल लॉक करून लावलेली मोटारसायकल (क्र. एम एस १६ बी एल ५३ ५७) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घटना एस बी आय चौकातील छावणी परिषदेच्या गाळ्यातील मोबाईल दुकानासमोर घडली. याप्रकरणी मयूर भागीनाथ दौंडे (रा.संकल्प कॉलनी, राधाकृष्ण मंदिराजवळ, बुऱ्हाणनगर, ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता ३०३ (२) अन्वये गुन्ह्याची नोंद केली. अधिक तपास पोलीस हवालदार पठाण करीत आहे.

# अनधिकृत गॅस रिफिलिंग सेंटरवर छापा

### सव्वा दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त, दोघा जणांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अनधिकृत गॅस रिफिलिंग सेंटरवर शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांच्या पथकाने छापा टाकला. या प्रकरणी रिफिलिंग सेंटरच्या मालकासह वाहन चालकाविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सेंटर चालक प्रवीण विष्णु जाधव (वय २५, रा. व्दारकाधीश कॉलनी, आलमगीर रस्ता, भिंगार) व रिक्षा चालक अमोल अर्जुन ढोबळे (वय ३५, रा. सचिननगर, शाहूनगर, केडगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. नालेगाव, अमरधामजवळील वरद चायनिजच्या पाठीमागे अनधिकृत गॅस रिफिलिंग सेंटर सुरू असल्याची माहिती उपअधीक्षक भारती यांना मिळाली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने १८ जानेवारीला दुपारी सदर ठिकाणी छापा टाकला असता तेथे प्रवीण जाधव याला घरगुती गॅस टाक्यांचा वापर करून मशिनव्दारे प्रवासी वाहतूक रिक्षामध्ये गॅस भरताना रंगेहाथ पकडले.

छाप्या दरम्यान गॅस रिफिलिंग मशिन, वजन काटा, भारत गॅसच्या तीन घरगुती गॅस टाक्या, प्रवासी वाहतूक रिक्षा, रोख रक्कम असा एकुण २ लाख २२ हजार ७८० रूपये किमतीच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई पो. हे.कॉ. सुयोग सुपेकर, महेश मगर, पो.ना. हेमंत खंडागळे, सागर द्वारके यांच्या पथकाने केली आहे. अधिक तपास कोतवाली पोलीस करत आहेत.

# हॉटेलसमोरून दुचाकीची चोरी

नगर – नगर मनमाड रोडवरील कॉटेज कॉर्नर येथील हिरा हॉटेल समोर रस्त्याच्या कडेला हँडेल लॉक करून लावलेली होंडा कंपनीची मोटारसायकल (क्र. एम एच १६ सी पी ५८३६ ) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी नामदेव सहदेव काळे (रा. चेतना कॉलनी, एमआयडीसी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ३०५ (ब) अन्वये चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार करणेबाबत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकाबरोबर आमच्या अशिलाची बोलणी चालु आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही. असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **५ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता. २०/०१/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका अहिल्यानगरपैकी अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे अरणगांव** येथील खालील वर्णनाचा बिगरशेती प्लॉट –
**सर्व्हे नं. ४५२/१/४५२/२ मधील खालील वर्णनाचा बिगरशेती प्लॉट**

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | यासी चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| २१ | ५४५.२५ | प्लॉट नं. २२ | प्लॉट नं. १४ मधील प्रायमरी स्कुल व ओपन स्पेस | ६.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. २० |
| २२ | ५०९.२५ | २०.०० मीटर रुंदीचा रस्ता | ओपन स्पेस | प्लॉट नं. २१ | प्लॉट नं. २३ |
| वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक<br>नरेंद्र शांतीकुमार फिरोदिया,<br>रा. शोभा सदन, औरंगाबाद रोड, अहिल्यानगर. | | | | | |

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं. ५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर. मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

